महाराष्ट्र चित्रपट,रंगभमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०० ०६५.

---

## "चित्रपट अधिकारी" या पदासाठी जाहिरात.

महामंडळात दर्जेदार मराठी चित्रपट निर्मितीस अर्थसहाय्य योजना, महाराष्ट्रातील ऐतिहासिक, सामाजिक, शैक्षणिक, कला व क्रिडा क्षेत्रातील व्यक्तींच्या जीवनावर आधारीत चित्रपट/माहिती/लघुपट निर्मितीकरिता अनुदान इ. योजना राबविण्यात येत आहेत. या संबंधित कामकाजाकरीता चित्रपट निर्मिती, दिग्दर्शन या क्षेत्रातील तांत्रिक ज्ञान असलेला “चित्रपट अधिकारी” या पदावर मुलाखतीद्वारे करार पद्धतीने नियुक्ती करण्यासाठी खालीलप्रमाणे अर्ज मागविण्यात येत आहेत:-

| अ. क्र | पदाचे नाव | पद संख्या | अर्हता | पदाची कर्तव्य व जबाबदाऱ्या |
|---|---|---|---|---|
| १ | चित्रपट अधिकारी | १ | १. मान्यताप्राप्त संस्था / विद्यापीठातून चित्रपट निर्मिती, दिग्दर्शन, जनसंवाद व पत्रकारिता या विषयातील पदवी आवश्यक.<br>२. मान्यताप्राप्त संस्था / विद्यापीठातून चित्रपट अभ्यासातील पदव्युत्तर पदवी / पदव्युत्तर डिप्लोमा असल्यास प्राधान्य दिले जाईल.<br>३. शैक्षणिक पात्रतेनंतर किमान ५ वर्षे चित्रपट निर्मिती क्षेत्रातील व्यावसायिक अनुभव आवश्यक.<br>४. सार्वजनिक किंवा खाजगी क्षेत्रातील प्रॉडक्शन हाऊस, प्रसारण संस्था, OTT प्लॅटफॉर्म, कंपनी, एंटरप्राइझेस किंवा कॉर्पोरेट संस्थांमध्ये काम केल्याचा अनुभव असावा.<br>५. **वयोमर्यादा:-** ५० वर्षांपर्यंत | १. शासन अनुदानित चित्रपट प्रकल्प हाताळण्याचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>२. चित्रपट प्रकल्पांच्या संकल्पनेपासून पूर्णत्वापर्यंत व्यवस्थापन करणे.<br>३. पूर्वनिर्मिती, चित्रीकरण, पोस्ट प्रोडक्शन व वितरण या संपूर्ण निर्मिती प्रक्रियेवर देखरेख करणे.<br>४. तांत्रिक व क्रिएटिव्ह टीम व विविध भागधारकांशी समन्वय साधून कामकाज सुरळीत पार पाडणे.<br>५. अंदाजपत्रक, वेळापत्रक व संसाधनांचे नियोजन व व्यवस्थापन करणे.<br>६. कायदेशीर अटी व चित्रपट उद्योग निर्मिती मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे.<br>७. दिग्दर्शक, निर्माता, लेखक व चित्रीकरण पथकासोबत जवळून समन्वय साधणे.<br>८. परवाने, परवानग्या, बौद्धिक संपदा हक्क व सुरक्षितता नियमांसह सर्व कायदेशीर व नियामक बाबींचे पालन सुनिश्चित करणे.<br>९. विपणन व वितरण पथकासोबत समन्वय साधून चित्रपट अपेक्षित प्रेक्षकांपर्यंत पोहोचविणे.<br>१०. चित्रपट / माहितीपट प्रतिष्ठित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये सहभागी होण्यासाठी समन्वय साधणे.<br>११. वरिष्ठांनी वेळोवेळी सोपविलेली इतर कामे. |

**अ. आवश्यक कौशल्ये:-**

१. शासन / निमशासकीय संस्थांच्या कार्यपद्धतींचे सखोल ज्ञान.

२. मराठी व इंग्रजी भाषेचे लेखी व मौखिक प्रभुत्व अनिवार्य.

३. संपूर्ण चित्रपट निर्मिती प्रक्रियेचे सखोल ज्ञान.

४. आर्थिक नियोजन, अंदाजपत्रक नियंत्रण व खर्च व्यवस्थापन कौशल्य.

५. प्रभावी संवाद, समन्वय व करार वाटाघाटी कौशल्य.

६. कायदेशीर, नियामक व सुरक्षितता नियमांचे ज्ञान (IP व परवाने सहित).

७. संपादन व चित्रपट-संबंधित सॉफ्टवेअरचे कार्यज्ञान.

**ब. वित्तलब्धी :-** रु.७५,०००/- (सर्व भत्यांसह) इतके मासिक मानधन अनुज्ञेय राहील.

क. अर्जाचा नमुना व इतर अनुषंगीक बाबी महामंडळाच्या www.filmcitymumbai.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

वरील अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता, अनुभव वयाच्या पुराव्याबाबतची कागदपत्रे, साक्षांकित प्रतीसह विहीत नमुन्यात अचूक भ्रमणध्वनी नमूद करुन खालील पत्यावर डाकद्वारे किंवा filmcitycao@gmail.com या इमेल आयडीवर ऑन लाईन दि.२५.०२.२०२६ सायंकाळी ५ वाजेपर्यंत अर्ज पोहचेल असा करावा.

प्राप्त होणाऱ्या अर्जांची संख्या विचारात घेऊन त्यानुसार छाननी करुन पात्र उमेदवारांचा अनुभव व वयोमर्यादा विचारात घेऊन सुयोग्य उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल सुयोग्य उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व हक्क महामंडळ राखून ठेवत आहेत. मुलाखतीचा दिनांक व वेळ पात्र उमेदारांना यथावकाश कळविण्यात येईल.

स्वाक्षरी,<br>
व्यवस्थापकीय संचालक<br>
म.चि.र.व सां.वि.म. मर्यादित

# "चित्रपट अधिकारी" या पदासाठी अर्जाचा नमुना

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नांव | |
| २ | जन्म तारीख | |
| ३ | पत्र व्यवहारासाठी पत्ता | |
| ४ | ई- मेल | |
| ५ | दूरध्वनी / मोबाईल क्रमांक | |
| ६ | शैक्षणिक अर्हता | |
| ७ | एकुण अनुभव | |
| ८ | इतर अर्हता | |

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी